**जालना जिल्हयातील मंठा, परतूर, घनसावंगी, भोकरदन, जाफ्राबाद, तालुक्यात असलेल्या प्रस्तावित २० वाळूघाटांच्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी बाबतचा इतिवृत्तांत :**

..................................................

जालना जिल्हयातील मंठा, परतूर, घनसावंगी, भोकरदन, जाफ्राबाद, तालुक्यात असलेल्या प्रस्तावित २० वाळुघाटांच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांचा प्रतिनिधी म्हणून मा. निवासी उप जिल्हाधिकारी, जालना यांची नियुक्ती करून त्यांच्या अध्यक्षतेखाली सदर सुनावणी ची प्रक्रिया पूर्ण करणे साठी सुचविले. त्या नुसार सदर सुनावणी मा. निवासी उप जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली दि. २७ आक्टोबर २०२० रोजी सकाळी ११-०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आयोजित करण्यात आली होती. परंतु सुनावणी दरम्यान मा. अध्यक्षांनी असे नमुद केले की, सदर सुनावणी २० वाळू घाटा ऐवजी १९ वाळू घाटासाठी घ्यावे. यातून चांगतपूरी या वाळू घाटाचे नाव वगळण्यात यावे कारण चांगतपूरी वाळू घाटाचे क्षेत्रफळ हे ५ हेक्टर पेक्षा जास्त आहे. त्यामूळे ही जनसुनावणी १९ वाळू घाटांची घेण्यात येत आहे. सदर नियोजित सुनावणी जागतिक आपत्ती कोविड १९ लॉकडाऊनमुळे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तसेच सीस्को वेबेक्स ॲपद्वारे घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६३ / २०२० पत्र क्रं. / जे.डी. (डब्ल्यूपीसी) /पीएच/ बी- २०१०२३ - एफटीएस - ०१०२ दि. २३/१०/२०२० अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात आली.

१. मा. जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी, जालना : अध्यक्ष

२. प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, औरंगाबाद : सदस्य

३. उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना : समन्वयक

डॉ. योगिनी बाळंखे , उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे. मा. अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांचा जालना जिल्हयातील २० वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २८/०९/२०२० रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जालना यांनी देशातील तसेच जिल्हयातील कोरोना व्हायरसचा प्रादूर्भाव लक्षात घेऊन आणि सुनावणीसाठी १०० पेक्षा जास्त नागरिकांची उपस्तितीची शक्यता लक्षात घेऊन सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय येथे तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे घेण्याबाबत आदेशित

केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी जागतिक आपत्ती कोविड १९ लॉकडाऊनमुळे सीस्को वेबेक्स ॲपद्वारे घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. २६/ सप्टेबंर रोजी दै. सामना (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया

(इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
- जिल्हा उदयोग केंद्र, जालना
- जिल्हा परिषद, जालना
- नगर परिषद, जालना
- तहसिलदार, तहसिल कार्यालय तालूका - मंठा, परतूर, घनसावंगी, भोकरदन, जाफ्राबाद, जि. जालना
- ग्रामपंचायत कार्यालय -

  अ) तालुका मंठा - मौ. भुवन-शिरपूर, देवठाणा उस्वद२, देवठाणा उस्वद३

ब) तालुका परतूर - मौ. डोल्हारा, बाबई, नांद्रा, ब्रम्हवडगाव, गोळेगाव, , सावरगाव बु.

क) तालुका घनसावंगी - मौ. भादली, जोगलादेवी, रांजणी

ड) तालुका भोकरदन - मौ. आव्हाणा, जवखेडा ठोंबरे, नळणी बु., खडकी

इ) तालुका जाफ्राबाद - मौ. पिंपळखुटा, देउळगाव उगले, जवखेडा ठेंग

* उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना

* प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद

* (मुख्यालय), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई

* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

* प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन अदयाप पर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे वाळूघाटांबाबत कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात. समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, जालना व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांच्या प्रतिनिधीस पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती मराठी भाषेमध्ये देण्याचे सुचित केले. त्यास अनुसरुन प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी जालना जिल्हयातील मंठा, परतूर, घनसावंगी, भोकरदन, जाफ्राबाद इत्यादी तालुक्यात असलेल्या १९ वाळुघाटांच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती मराठी भाषेमध्ये दिली. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

जालना जिल्हयातील मंठा, परतूर, घनसावंगी, भोकरदन, जाफ्राबाद तालुक्यात असलेल्या १९ वाळूघाटांसाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. सदर जाहीर लोकसुनावणी बाबतची जाहीर सुचना दै. सामना व टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमानपत्रांमध्ये देण्यात आली होती व ऑनलाईन लिंकसुध्दा कळविण्यात आली होती. महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण – २०१९ / पी.के.०१ / ता.के. ३ दि. ३ डिसेंबर,२०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते.

मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचे आदेश क्रं. २०२० / मशाका / गौख

/ कावी १०५ दि ०३/०२/२०२० अन्वये मे. इंटिग्रेटेड प्रेसिजन सिस्टम अँड <u>सर्व्हिसेस प्रा. लि. यांना जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेमार्फत जालना जिल्हयातील वाळूच्या घाटासाठी</u> (१. मंठा – (०३) – मौ. भुवन-शिरपूर,

देवठाणा उस्वद२, देवठाणा उस्वद३, २. परतूर - (०७) - मौ. डोल्हारा, बाबई, नांद्रा, ब्रम्हवडगाव, गोळेगाव, सावरगाव बु. ३. भोकरदन - (०४) - मौ. आव्हाणा, जवखेडा ठोंबरे, नळणी बु., खडकी, ४. जाफ्राबाद - (०३), मौ. पिंपळखुटा, देउळगाव उगले, जवखेडा ठेंग ५. घनसावंगी - (०३), मौ. भादली, जोगलादेवी, रांजणी) पर्यावरण मंजूरी मिळण्याचे काम देण्यात आले.

सदर मायनिंगमध्ये ड्रिलिंग आणि ब्लास्टिंगशिवाय ओपनकास्ट मॅन्युअल पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. केवळ कुदळ, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. टॅक्टर ट्रॉली ट्रकद्वारे वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. ग्रीनबेल्ट डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत १५० झाडे लावण्यात येतील. व्यावसायीक आरोग्य सुरक्षा व्यवस्थापनासाठी खाण चालकांना वैयक्तिक

संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. सदर प्रस्तावित
प्रकल्पामुळे स्थानिक रहिवाशांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर मा. अध्यक्षांनी व्हीसीमधील उपस्थितांना आपल्या लेखी / तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गांव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवा.

तालुकावार वाळुघाटांची माहितीचे वाचन करण्यात आले व तदनंतर संबधित तहसिलदारांना त्यांची वा त्यांच्या कार्यालयात उपस्थित असलेले लोकप्रनिधी / नागरिक यांचे कांही आक्षेप / सुचना असतील तर ते कळविण्याची विनंती करण्यात आली.

१. <u>तालुका मंठा-०३</u>

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|
| ०१. | भूवन शिरपूर,<br>भूवन -गट क्रं. ०१,<br>शिरपूर-गट क्रं. ३९०,३७४,३७३,३७०,३६९. | १.७५ | ६१८४ |
| ०२. | देवठाणा उस्वद २<br>देवठाणा (उस्वद)- गट क्रं. २५३, २५२, २५१, | ३.१३२ | ५५३३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | २१८, २१७, २१६, २१५, २१४, २१३, २१२, २१०<br>उस्वद- गट क्रं. ४०४,४०५,४०७, १,२,३,४ | | |
| ०३. | देवठाणा उस्वद ३<br>देवठाणा (उस्वद) - गट क्रं. १६२, १५३, १५२<br>उस्वद- गट क्रं. १६, २८, २९, ३०, ३१, ४२, ४३, ४६ | ३ | ८४८१ |

मा. अध्यक्षांनी तहसिलदार मंठा यांना विचारणा केली की, मंठा तालुक्यातील सरपंच / लोकप्रतिनिधी / नागरिक यांना कांही बोलायचे आहे का? किंवा कोणाची सुचना वगैरे आहे का? मा. अध्यक्षांनी तहसिलदार मंठा यांना आपला काही मुददा असल्यास मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन तहसिलदारांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडून कांहीही सुचना अक्षवा आक्षेप नाही. तसेच सुनावणीदम्यान उपस्थित असलेल्या संबंधीतांचेही काही आक्षेप नसल्याचे त्यांनी कळविले. मा. अध्यक्षांनी त्यांच्या कार्यालयात सदर जाहीर लोक सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींची / नागरिकांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक व तहसिल कार्यालयाचा अभिप्राय इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडे सादर करण्याचे आदेशित केले.

२. <u>तालुका परतूर-०६</u>

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|
| १. | मौ. डोल्हारा<br>गट क्रं. ७२, ६१, ६०, ५९, ५५, ५४, ५३, | ०.३ | ३१८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४७१, ४७०, ४६९,४६४, ४६३, ४५२ | | |
| २. | मौ. बाबई<br>गट क्रं. ५४, १६६, १६५, १६४, १५२, १५१, १५०, १४७, १४८, १४९ | १.५ | ५३०० |
| ३. | मौ. नांद्रा<br>गट क्रं. १२८, १२७, १२६ | १.३५ | २३८५ |
| ४. | मौ. ब्रम्हवडगाव<br>गट क्रं. ३०५, ३०६, ३०७, ३०८ | १.८४ | ५२०१ |
| ५. | मौ. गोळेगाव<br>गट क्रं. ३०१, ३०२ | १.१ | ३८८७ |
| ६. | मौ. सावरगाव बु.<br>गट क्रं. ११४, ११५ | १.२ | ४२४० |

मा. अध्यक्षांनी तहसिलदार परतूर यांना विचारणा केली की, परतूर तालुक्यातील सरपंच / लोकप्रतिनिधी / नागरिक यांना कांही बोलायचे आहे का? किंवा कोणाची सुचना वगैरे आहे का?. त्यास अनुसरुन तहसिलदारांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडून कांहीही सुचना अक्षवा आक्षेप नाही. तसेच सुनावणीदम्यान उपस्थित असलेल्या संबंधीतांचेही काही आक्षेप नसल्याचे त्यांनी कळविले. मा. अध्यक्षांनी त्यांच्या कार्यालयात सदर जाहीर लोक सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींची / नागरिकांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक व तहसिल कार्यालयाचा अभिप्राय इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडे सादर करण्याचे आदेशित केले.

३. <u>तालुका भोकरदन-०४</u>

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|
| १. | मौ. आव्हाणा<br>गट क्रं. ९१३, ९२७, ३७, ३६ | ०.४०५ | ७१५ |
| २. | मौ. जवखेडा ठोंबरे<br>गट क्रं. ३१२, ३१३, ३१४, ३२६, ३२७ | २.३४ | ४१३४ |
| ३. | मौ. नळणी बु.<br>गट क्रं. ३८७ | ०.६ | १२७२ |
| ४. | मौ. खडकी<br>गट क्रं. १३२ | ०.३० | ५३० |

मा. अध्यक्षांनी तहसिलदार भोकरदन यांना विचारणा केली की, भोकरदन तालुक्यातील सरपंच / लोकप्रतिनिधी / नागरिक यांना कांही बोलायचे आहे का? किंवा कोणाची सुचना वगैरे आहे का? मा. अध्यक्षांनी तहसिलदार भोकरदन यांना आपला काही मुददा असल्यास मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन तहसिलदारांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडून कांहीही सुचना अक्षवा आक्षेप नाही. तसेच सुनावणीदम्यान उपस्थित असलेल्या संबंधीतांचेही काही आक्षेप नसल्याचे त्यांनी कळविले. मा. अध्यक्षांनी त्यांच्या कार्यालयात सदर जाहीर लोक सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींची / नागरिकांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक व तहसिल कार्यालयाचा अभिप्राय इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडे सादर करण्याचे आदेशित केले.

४. <u>तालुका जाफ्राबाद-०३</u>

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|
| १. | मौ. पिंपळखुटा<br>गट क्रं. ८६ | ०.२ | ७०६ |
| २. | मौ. देउळगाव उगले<br>गट क्रं. १२३, १६०, १६२, १६३ | ०.२२५ | ६३६ |
| ३. | मौ. जवखेडा ठेंग<br>गट क्रं. १६, ५०, ५१, ८९, १५ | १.०२५ | २८९८ |

मा. अध्यक्षांनी तहसिलदार जाफराबाद यांना विचारणा केली की, जाफराबाद तालुक्यातील सरपंच / लोकप्रतिनिधी / नागरिक यांना कांही बोलायचे आहे का? किंवा कोणाची सुचना वगैरे आहे का? मा. अध्यक्षांनी तहसिलदार जाफराबाद यांना आपला काही मुददा असल्यास मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन तहसिलदारांनी सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडून कांहीही सुचना अक्षवा आक्षेप नाही. तसेच सुनावणीदम्यान उपस्थित असलेल्या संबंधीतांचेही काही आक्षेप नसल्याचे त्यांनी कळविले. मा. अध्यक्षांनी त्यांच्या कार्यालयात सदर जाहीर जन सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींची / नागरिकांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक व तहसिल कार्यालयाचा अभिप्राय इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडे सादर करण्याचे आदेशित केले.

५. <u>तालुका घनसावंगी–०३</u>

| अ.क्रं. | वाळूघाटाचे नांव | क्षेत्र (हे) | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|
| १. | मौ. भादली<br>गट क्रं. १५३, १५४, १५९, १६० गाव जवळ २७, २८ | १.७३२५ | ६१२१ |
| २. | मौ. जोगलादेवी<br>गट क्रं. २०१, २०२, २०६ | २.९२५ | १०३३५ |
| ३. | मौ. रांजणी<br>गट क्रं. ४८, ४९ | ०.४५६ | १२८९ |

मा. अध्यक्षांनी तहसिलदार घनसावंगी यांना विचारणा केली की, घनसावंगी तालुक्यातील सरपंच / लोकप्रतिनिधी / नागरिक यांना कांही बोलायचे आहे का? किंवा कोणाची सुचना वगैरे आहे का? मा. अध्यक्षांनी तहसिलदार घनसावंगी यांना आपला काही मुददा असल्यास मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन तहसिलदारांनी सांगितले की, त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांकडून कांहीही सुचना अक्षवा आक्षेप नाही. तसेच सुनावणीदम्यान उपस्थित असलेल्या संबंधीतांचेही काही आक्षेप नसल्याचे त्यांनी कळविले. मा. अध्यक्षांनी त्यांच्या कार्यालयात सदर जाहीर लोक सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधींची / नागरिकांची नांवे, पत्ते, मोबाईल क्रमांक व तहसिल कार्यालयाचा अभिप्राय इत्यादी बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचेकडे सादर करण्याचे आदेशित केले.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे

असतील तर ते मांडू शकतात. प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी पर्यावरणीय व्यवस्थापनासाठी आर्थीक तरतुद करण्याचा मुददा उपस्थित केला. सदर मुदयाची पुर्तता करण्याचे प्रकल्प सल्लागारांनी मान्य केले.

सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा जिल्हा दंडाधिकारी यांचे परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

( **डॉ. योगिनी बाळंखे** )
समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,
जालना

( **डॉ. प्र. म. जोशी** )
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

(**केशव नेटके** )
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा निवासी उप जिल्हाधिकारी, जालना